# हॅलो जनता

जळगांव > पाचोरा > भडगांव > चाळीसगांव > चोपडा

**सुविचार -** "कधी कधी आपलं शांत राहणं खूप गरजेचं असतं, आयुष्याकडे सर्वच प्रश्नांची उत्तरं मागायची नसतात."

शुक्रवार, दिनांक ०१ मे, २०२६. | ● वर्ष - पहिले | ● अंक ०६ | ● पृष्ठ ०४ | ● मूल्य - २ रूपये | ● www.hellojanata.com.


**तापमान / हवामान**

सूर्यास्त 6.52 वा. | सूर्योदय 5.59 वा.


दिवसा $43^0$ कमाल | रात्री $26.2^0$ किमान

आकाश निरभ्र राहील. कमाल तापमानात वाढ होणार.

**स्थानिक सोने-चांदी भाव**

| सोने | | चांदी |
|---|---|---|
| 24 कॅरेट | 22 कॅरेट | प्रति किलो |
| 148500 | 136130 | 241000 |
| (-2300) | (-2108) | (-3000) |

(भाव प्रति 10 ग्रॅमध्ये, जीएसटी एक्स्ट्रा)




# भडगाव येथील उपबाजार समितीमध्ये शेतमाल लिलावाचा शुभारंभ.

## शेतकऱ्यांना मिळणार आता स्पर्धात्मक दर

**हॅलो जनता प्रतिनिधी | भडगांव**

पाचोरा कृषी उत्पन्न बाजार समितीच्या भडगाव उपबाजार आवारात यंदाच्या शेतमालाच्या जाहीर लिलावाला सुरुवात करण्यात आली आहे. याबाबतची माहिती बाजार समितीचे सभापती गणेश भिमराव पाटील व संचालक लखीचंद पाटील यांनी दिली. यावर्षी मक्याबरोबरच ज्वारी, हरभरा, गहू आदी पिकांचा आवक भडगाव भागातून मोठ्या प्रमाणावर होत आहे. पाचोरा-भडगाव कार्यक्षेत्रासह भडगाव परिसरातून मोठ्या प्रमाणात शेतमाल बाजारात येत असल्याने व्यापारी व शेतकऱ्यांच्या अडचणी सोडवण्यासाठी बाजार समितीने सोमवारी बैठक आयोजित केली होती. या बैठकीत विविध समस्या आणि अडचणींवर चर्चा करून शेतकऱ्यांच्या सूचनांना नुसार लागलीच शेतमालाचा जाहीर लिलाव सुरू करण्याचा निर्णय घेण्यात आला. यामुळे शेतकऱ्यांना अधिकाधिक बाजारभाव मिळून त्यांना चांगल्या सुविधा उपलब्ध होतील, असा विश्वास बाजार समितीने व्यक्त केला आहे. मोजणी आणि तत्काळ पेमेंटची तसेच बाजार समितीत योग्य वजन सुविधा उपलब्ध असल्यामुळे शेतकऱ्यांनी विक्रीसाठी आपला शेतमाल बाजार समितीतच आणावा, असे आवाहन करण्यात आले आहे.



लिलाव वेळी मालाची पाहणी करताना व्यापारी व शेतकरी.

### फसवणूक टाळण्यासाठी बाजार समितीचे आवाहन

दरम्यान, खासगी ठिकाणी किंवा अनधिकृत व्यापाऱ्यांकडे शेतीमाल विक्री करताना फसवणुकीची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे शेतकऱ्यांनी अधिकृत बाजार समितीतच व्यवहार करावेत, असेही पदाधिकाऱ्यांनी स्पष्ट केले आहे. या उपक्रमामुळे भडगाव उपबाजारात आर्थिक उलाढाल वाढण्यास चालना मिळणार असून, स्थानिक अर्थव्यवस्थेलाही याचा सकारात्मक परिणाम होणार आहे. तसेच भविष्यात बाजार समितीमार्फत आणखी सुविधा उपलब्ध करून देण्याचा मानस व्यक्त करण्यात आला. यावेळी उपसभापती प्रकाश अमृत पाटील, संचालक लखीचंद प्रकाश पाटील, सचिव बी. बी. बोरसे, उपसचिव प्रतीक रमेश ब्राह्मण यांच्यासह व्यापारी, हमाल आणि कष्टकरी शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# यावलच्या चारुदत्त अढळकर यांची फॅशन शोमध्ये दमदार कामगिरी

**हॅलो जनता प्रतिनिधी | जळगाव**

यावल तालुक्यातील तरुण प्रतिभावान विद्यार्थी चि. चारुदत्त जितेंद्र अढळकर (वय १७) यांनी फॅशन क्षेत्रात उल्लेखनीय यश मिळवत "बेस्ट वॉक मिस्टर जळगाव" हा मानाचा किताब पटकावला आहे. सध्या एम.जे. कॉलेज, जळगाव येथे ११ वी सायन्सचे शिक्षण घेत असलेल्या चारुदत्त यांनी आपल्या आत्मविश्वासपूर्ण रॅम्प वॉकने सर्वांचे लक्ष वेधून घेतले. नुकत्याच मिस्टर अँड मिस जळगाव सीझन ४ फॅशन शो या स्पर्धेचे आयोजन क्वेश्चन मार्क फॅशन ब्रँड यांच्या वतीने करण्यात आले होते. ही स्पर्धा २५ एप्रिल २०२६ रोजी सायंकाळी ६ ते १० या वेळेत ग्रीन वुड्स बालानी येथे उत्साहात पार पडली. या स्पर्धेत अनेक स्पर्धकांनी सहभाग घेतला होता. मात्र चारुदत्त अढळकर यांच्या प्रभावी चालण्याच्या शैलीने आणि आत्मविश्वासपूर्ण सादरीकरणाने परीक्षकांना विशेष प्रभावित केले. त्यांच्या रॅम्पवरील सादरीकरणात स्टाईल, ॲटिट्यूड आणि आत्मविश्वासाचा सुंदर संगम पाहायला मिळाला. कार्यक्रमाचे आयोजन जॅस तिवारी, सिद्धार्थ अहिरे आणि आर्यन बजाज यांनी यशस्वीरीत्या पार पाडले. चारुदत्त यांनी आपल्या या यशाचे श्रेय आई-वडील आणि मार्गदर्शक जॅस तिवारी मॅडम यांना दिले आहे. या यशामुळे यावल व जळगाव परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून, चारुदत्त यांच्या पुढील वाटचालीकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. भविष्यात मॉडेलिंग क्षेत्रात मोठे यश मिळवण्याचा त्यांचा निर्धार असून, त्यांच्या या यशामुळे परिसरातील तरुणांनाही नवी प्रेरणा मिळत आहे.

## "बेस्ट वॉक मिस्टर जळगाव" किताबावर चारुदत्तची मोहोर



## एरंडोलमध्ये गौतम बुद्ध जयंती समितीची बैठक उत्साहात संपन्न सुमित (लकी भाऊ) शिंदे अध्यक्षपदी निवड.



एरंडोल : गौतम बुद्ध यांच्या जयंतीनिमित्त एरंडोल शहरातील भीमनगर येथे बुद्ध जयंती समितीची बैठक बुधवारी (दि. २९ एप्रिल) उत्साहपूर्ण आणि मंगलमय वातावरणात पार पडली. बैठकीत सर्वानुमते सुमित उर्फ लकी भाऊ शिंदे यांची अध्यक्षपदी निवड करण्यात आली. यावेळी समितीची पुढील कार्यकारिणी जाहीर करण्यात आली. उपाध्यक्षपदी बंटी सरदार, खजिनदारपदी रोहित गायकवाड तर कार्याध्यक्ष म्हणून सागर सरदार, सचिन बोरसे, आकाश इंगळे आणि उमेश बोरसे यांची निवड करण्यात आली. बैठकीस प्रमुख मार्गदर्शक म्हणून प्रकाश शिंदे, नितीन बोरसे, उमेश भाऊ शिंदे, रवी बोरसे, अभिषेक शिंदे, संघरत्न गायकवाड, लखन बनसोडे, प्रवीण बाविस्कर, अमोल शिंदे, मनोज बोरसे, राहुल बोडरे, प्रवीण खैरनार, दिनेश बोरसे, मनोहर बोडरे, जितेंद्र बोडरे आदींसह भीमसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी उपस्थितांनी बुद्धांच्या विचारांचा समाजात अधिकाधिक प्रसार करण्याचा निर्धार व्यक्त केला. बैठकीत बुद्ध जयंतीनिमित्त विविध सामाजिक उपक्रम आणि धम्मदान कार्यक्रमांचे नियोजन करण्यात आले. त्यानुसार दि. १ मे रोजी सकाळी खीरदान कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येणार असून, समाजात बंधुभाव आणि मानवतेचा संदेश देण्यावर भर राहणार आहे. तसेच सायंकाळी ७ वाजता एरंडोल शहरातून भव्य बौद्ध शांती यात्रेचे आयोजन करण्यात आले आहे. ही यात्रा बुद्धांच्या शांती, करुणा व धम्माच्या विचारांचा प्रसार करणारी ठरणार आहे. यात्रेनंतर रात्री ९ वाजता सामूहिक भोजनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला असून, सर्व समाजबांधवांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन आयोजकांकडून करण्यात आले आहे. "बहुजन हिताय, बहुजन सुखाय" या विचारांना केंद्रस्थानी ठेवून सर्व कार्यक्रम शांततामय आणि उत्साहपूर्ण वातावरणात पार पाडण्याचा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला.

## तापमानाचा तडाखा; सिग्नल बंद करण्याची मनसेची मागणी, पोलिसांकडून सकारात्मक संकेत

**हॅलो जनता प्रतिनिधी : जळगांव**

जळगाव शहरात वाढत्या उष्णतेमुळे नागरिक हैराण झाले असताना महाराष्ट्र नवनिर्माण सेना (मनसे) आक्रमक झाली आहे. शहरातील वाहतूक सिग्नल संध्याकाळी ६ वाजेपर्यंत बंद ठेवण्याची ठोस मागणी मनसेने केली असून, यासंदर्भात वाहतूक विभागाला निवेदन सादर करण्यात आले आहे. मनसेच्या निवेदनात स्पष्टपणे नमूद करण्यात आले आहे की, सध्या तापमानाने उच्चांक गाठला असून, विशेषतः दुचाकीस्वारांना चौकांमध्ये सिग्नलवर उभे राहणे जीवघेणे ठरत आहे. प्रखर उन्हात काही मिनिटे थांबावे लागल्याने चक्कर येणे, अशक्तपणा जाणवणे अशा समस्या वाढत असून, नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. या गंभीर परिस्थितीची दखल घेत मनसेने सकाळपासून सायंकाळी ६ वाजेपर्यंत शहरातील प्रमुख सिग्नल बंद ठेवावेत, अशी मागणी केली आहे. तसेच वाहतूक कोंडी टाळण्यासाठी महत्त्वाच्या चौकांवर पोलिसांची तैनाती करून पर्यायी यंत्रणा उभी करण्याचाही प्रस्ताव दिला आहे. दरम्यान, या मागणीवर वाहतूक पोलिसांनी सकारात्मक भूमिका घेतली असून, परिस्थितीचा आढावा घेऊन योग्य तो निर्णय घेतला जाईल, असे संकेत दिले आहेत. त्यामुळे नागरिकांना उन्हाच्या झळांपासून काहीसा दिलासा मिळण्याची शक्यता व्यक्त होत आहे.



निवेदन देताना मनसे पदाधिकारी

### यावेळी यांची होती उपस्थिती

जिल्हाध्यक्ष ॲड. जमील देशपांडे, महानगराध्यक्ष विनोद शिंदे, उपमहानगराध्यक्ष श्रीकृष्ण मेंगडे, ललित शर्मा, राजेंद्र निकम, आशुतोष जाधव, चेतन पवार, संदीप मांडोळे, खुशाल ठाकूर, राहुल चव्हाण, शेतकरी सेनेचे तालुकाध्यक्ष प्रदीप पाटील, जितेंद्र पाटील, साजन पाटील, युसुफ खाटीक, बादशाह शहा, राजेश मराठे यांच्यासह मोठ्या संख्येने महाराष्ट्र सैनिक उपस्थित होते.

## पानिपत रौप्य महोत्सवी शौर्यदिनानिमित्त विचारमंथन बैठक

**हॅलो जनता प्रतिनिधी | जळगांव**

जळगांव १४ जानेवारी रोजी होणाऱ्या राष्ट्रीय स्तरावरचा शौर्य दिवस हा पानिपतच्या तिसऱ्या महायुद्धात मराठ्यांनी दिलेल्या बलिदानाची आणी अतुलनिय शौर्याची आठवण म्हणून दरवर्षी हरियाणातील आपले मराठा बांधव मोठ्या ऊत्साहात शौर्य दिवस म्हणून साजरा करतात त्यासाठी संपुर्ण भारतातुन समाजबांधव मोठ्या संख्येने ऊपस्थित असतात. येत्या १४जानेवारी २०२७रोजी चा कार्यक्रम हा २५ वर्ष पुर्तीनिमित्त रौप्यमहोत्सवी असल्याने भव्य दिव्य साजरा करणेसाठी व या कार्यक्रमाचे स्वरुप विषद करणेसाठी आ भा. मराठा जागृती मंचचे महाराष्ट्र प्रदेशऊपाध्यक्ष मराठा राजेश कल्याणजी आणी संघटनेचे पदाधिकारी पानिपत (बसताडा) हरियाणा येथून जळगांव येथे येत आहेत. त्यानिमित्त मराठा समाजाची विचारविनिमय चिंतन बैठक दि.०२.०५.२०२६ रोजी संध्याकाळी ५.०० वाजता पदमालय विश्राम गृह जळगांव येथे आयोजित केली आहे. तरी समाजातील सर्व संघटनांचे प्रतिनिधी व समाजप्रिय बांधावांनी या महत्वपुर्ण बैठकीस ऊपस्थित रहावे असे आवाहन मराठासेवासंघाचे प्रदेशऊपाध्यक्ष सुरेंद्र पाटील, विभागिय अध्यक्ष राम पवार, मा. विभागिय अध्यक्ष सुरेश पाटील, विभागिय सुमित खुशाल कार्याध्यक्ष पाटील, महानगराध्यक्ष चव्हाण, जिल्हाकार्याध्यक्ष इंजि हिरामण चव्हाण, ऊद्योजक प्रा.डी डी बच्छाव नाईक (भुसावळ) निंबाजी साळुंखे यांनी समाजबांधवांना ऊपस्थितीचे आवाहन केले आहे.

## धावत्या बसमधून प्रवाशाचे दागिने, रोकड लंपास

**हॅलो जनता प्रतिनिधी | जळगांव**

जळगाव : शहरातील गजबजलेल्या आकाशवाणी चौकातून धावत्या बसच्या डिक्कीतून दागिने आणि रोख रक्कम चोरून नेल्याची घटना समोर आली आहे. या प्रकरणी जिल्हापेठ पोलीस ठाण्यात अज्ञात चोरट्याविरुद्ध चोरीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. फिर्यादी दुर्गा रवींद्र राठोड (वय ३०, रा. सेंधवा, जि. बडवाणी, मध्य प्रदेश) या २७ एप्रिल रोजी प्रवास करत असताना दुपारी ३ वाजेच्या सुमारास जळगाव शहरातील आकाशवाणी चौकातून त्यांची बस जात होती. यावेळी बसच्या डिक्कीमध्ये ठेवलेले त्यांचे साहित्य अज्ञात चोरट्याने लंपास केले. एकूण किंमत १२,५०० रुपयेचा मुद्देमाल चोरीस गेला आहे. आपले दागिने आणि पैसे चोरीला गेल्याचे लक्षात येताच दुर्गा राठोड यांनी जिल्हापेठ पोलीस ठाणे गाठून तक्रार दिली. त्यांच्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तपास पोलीस हेड कॉन्स्टेबल रवींद्र ठाकरे करीत आहे



### एरंडोलजवळ भरधाव एसटीचा भीषण अपघात; १८ प्रवासी जखमी, चालकाला पायाला गंभीर स्वरूपाची दुखापत

एरंडोल :- एरंडोल पासून काही अंतरावर भालगाव फाटा नजीक आज सकाळी धुळेहून भुसावळकडे जाणाऱ्या एसटी बस एम.एच २० बिएल ३४१२ बसचा भीषण अपघात झाल्याची घटना समोर आली आहे. भरधाव वेगात असलेल्या बसवरील चालकाचे अचानक नियंत्रण सुटल्यामुळे बस रस्त्यालगतच्या डिव्हायडरला जोरात धडकली. या अपघातात एकूण १८ प्रवासी जखमी झाले असून काही प्रवाशांना गंभीर स्वरूपाचे दुखापत आहे. अपघातग्रस्त बसमध्ये १५ प्रवासी, १ चालक, १ वाहक आणि राज्य परिवहन महामंडळाचा १ कर्मचारी असे एकूण १८ जण प्रवास करत होते. धडकेनंतर प्रवाशांमध्ये एकच गोंधळ उडाला. स्थानिक नागरिकांच्या मदतीने जखमींना तात्काळ रुग्णालयात दाखल करण्यात आले. या दुर्घटनेत चालकाच्या पायाला गंभीर दुखापत झाली असून त्यांच्यावर उपचार सुरू आहेत. बसवरील नियंत्रण अचानक सुटल्यामुळेच हा अपघात घडल्याची प्राथमिक माहिती समोर येत आहे. दरम्यान, या अपघाताच्या पार्श्वभूमीवर रस्त्याचे सुरू असलेले काम, डिव्हायडरची रचना, तसेच बस चालकांवर असलेला कामाचा ताण या सर्व बाबींचा सखोल विचार करणे आवश्यक असल्याची मागणी नागरिकांकडून होत आहे. वारंवार घडणाऱ्या अशा अपघातांना आळा घालण्यासाठी संबंधित विभागाने तातडीने उपाययोजना कराव्यात, अशीही मागणी व्यक्त होत आहे.

**हॅलो जनता न्यूज**

## लग्नानंतर माहेरी येणाऱ्या नववधूसह हळदीपूर्वीच वाग्दत्त वधूचा अपघाती मृत्यू; दोन कुटुंबांवर दुःखाचा डोंगर

# ज्या घरात सनई-चौघडा, त्याच घरात मृत्यूचा आक्रोश

**जळगाव : एका घरात लग्न सोहळ्याचा आनंद व दुसऱ्या घरात लग्नाची धामधूम सुरू असताना नियतीने अकोला व परतवाडा येथील कुटुंबांतील लेकी हिरावून घेतल्या, लग्नाच्या तीन दिवसांनंतर माहेरी येणाऱ्या नववधूला माहेरी पोहचण्याची ओढ लागलेली असताना वाहन टँकरवर धडकले व तिला जीम गमवावा लागला. अशाच दुसऱ्या हृदयद्रावक घटनेत वणी गडावर लग्नपत्रिका ठेवून घरी परतताना कारचे टायर फुटले व वाग्दत वधूला हळद लागण्यापूर्वीच काळाने हिरावून घेतले. ज्या घरात सनई आणि चौघड्याचे सूर होते, त्या घरात आता नववधू व उपवर मुलीसह तिच्या नातेवाईकांच्या अपघाती मृत्यूनंतर आक्रोश आहे. बुधवारी, वेगवेगळ्या ठिकाणी झालेल्या या अपघातात अकोला व परतवाडा येथील दोन कुटुंबांवर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. या अपघातातील जखमींवर प्राथमिक उपचारानंतर ते अकोला व परतवाडा येथे रवाना झाले आहे.**

## लग्नाची मेहंदी पुसण्याआधीच काळाची झडप; नववधूसह काका व मामा ठार

### माहेरी परतताना अपघात : वडिलांसह सहा जण जखमी



वाहनाची झालेली अवस्था व नववधू पूजा वाघळकर.

जळगाव : तीन दिवसांपूर्वी लग्न झाले. पहिल्या ओवाळणीला माहेरी परतणाऱ्या नववधूच्या वाहनाला अपघात झाला. यात नववधू पूजा रवी वाघळकर (२२), तिचे काका जगदीश चंद्रभान वाघळकर (५२) व मामा दत्तू तुळशीराम भागवत (वय ५२, सर्व रा. महाकालीनगर, अकोला) हे ठार झाले. तर नतवधूचे वडील, चुलत भाऊ, तीन मेहुणे, आजोबा व भाचा असे सहा जण जखमी झाले. हा अपघात बुधवारी (२९ एप्रिल) सकाळी ९ वाजेच्या सुमारास वराह (ता. धरणगाव) जवळ झाला, लग्नाची मेहंदी पुसण्याआधीच नववधूसह इतरांवर काळाने झाडप घातल्याने हळहळ व्यक्त होत आहे. पूजा वाघळकर हिचा २६ एप्रिल रोजी अकोला येथे वापी येथील तरुणाशी मोठ्या थाटामाटात विवाह झाला. त्यानंतर २८ एप्रिल रोजी वापी येथे स्वागत समारंभाचा कार्यक्रम झाल्यानंतर रात्री १२ वाजता ते अकोला येथे जाण्यासाठी निघाले. सकाळी नऊ वाजेच्या सुमारास वराड गावाजवळ त्यांचे वाहनाचे (क्र. एमएच ३० एब्रेड ४७१०) चाक निखळले व ते समोरील टँकरवर जाऊन धडकले. यात वाहनाचा चुराडा झाला.

### १४ जणांपैकी ३ ठार, ६ जखमी


अपघातग्रस्त वाहनात १४ जण होते. त्यातील ३ जाण ठार झाले, तर वडील स्वी प्रभाकर वाघळकर, चुलत भाऊ प्रेम भारत वाघळकर (२४), मेहुणे नितेश सुरेश कडोळे (३५), अमोल दामोदर गिते (३५), आजोबा तुळशीराम भीमराव भागवत (६७), भाचा अंश नितेश कडोळे (१४) हे सहा जण जखमी झाले. सर्व जखमींना जळगाव येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. वाहनातील अन्य पाच जणांना किरकोळ दुखापत झाली होती. त्यामुळे ते अकोला येथे परतले.

### नववधू ठार, तर वडील वाहनात दबले

अपघातात नववधू पूजा वाधळकर, तिचे काका अगदीश वाधळकर व मामा दत्तू भागवत हे जागीच ठार झाले. तर मागे बसलेले वडील स्वी प्रभाकर वाघळकर हे वाहनात दबले गेले. तसेच मेहुणे नीतेश कडोळे है वाहनाच्या बाहेर फेकले गेले. २६ एप्रिल रोजी लग्न झाल्यानंतर वधू-वराच्या घरी आनंदाचे वातावरण होते. मात्र नववधू माहेरी परतत असताना काळाने झडप घातली व लग्नानंतर तीनच दिवसांत लग्नघरात शोककळा पसरली.

## १० दिवसांनी कन्यादान करायचे, तिचाच मृतदेह नेण्याची पित्यावर वेळ

### १० दिवसांवर लग्न आलेली वाग्दत्त वधू अपघातात ठार



अपघातानंतर कारची झालेली दुरवस्था.

जळगाव तणी गडावर लग्नपत्रिका ठेवून परतताना झालेल्या अपघातात शिखा विनायक बेलसरे (वय: २७) ही वाग्दत्त वधू ठार झाली. तिचा मृतदेह घेण्यासाठी तिचे वडील जळगावात आले व मृतदेह पाहून त्यांनी हंबरडा फोडला. १० दिवसांनी ज्या मुलीचे कन्यादान करायचे, तिचा मृतदेह नेण्याची दुर्दैती वेळ विनायक बेलसरे यांच्यावर आली. परतवाडा येथील शिखा बेलसरे या तरुणीचे ८ मे रोजी, लग्न होणार होते. त्यासाठी वणी गडावर लग्नपत्रिका ठेवण्यासाठी शिखासह तिचा भाऊ शुभम बेलसरे (३०), त्यांच्या शेजारी राहणारे सुनील वामनराव मानकर व त्यांच्या पत्नी मीना मानकर हे चारही जण २८ रोजी गेले होते. तेथे पत्रिका ठेवून २९ रोजी पहाटे पाच वाजता ते परतवाडा येथे जाण्यासाठी कारने (एमएच १४, जीएन ८२९९) निघाले. सकाळी ८:३० वाजता ते महादेवाचे बांबरूड, ता. पाचोरा येथे आले असता, कारचे टायर फुटून ती झाडावर धडकली. या घटनेत चारही जण जखमी झाले. त्यांना पाचोरा ग्रामीण रुग्णालयात दाखल केले. तेथे मीना मानकर यांचा मृत्यू झाला. शिखा हिचा उपचार सुरू असताना मृत्यू झाला.


### मृतदेह पाहून शोक अनावर

मुलगा शुभम बेलसरे याने वडिलांना अपघाताची माहिती कळविली व ते मित्रासह जळगाव येथे रुग्णालयात पोहोचले. मुलीचा मृतदेह पाहून त्यांना शोक अनावर झाला. ८ मे रोजी लग्न असलेल्या मुलीचे कन्यादान करण्या ऐवजी पित्यालाच मुलीचा मृतदेह घरी नेण्याची वेळ आली.

### देवीची ओटी भरल्याचे लेकीशी शेवटचे बोलणे

मुलगी शिखा ही गडावर पोहोचल्यानंतर तिने पत्रिका ठेवून ओटी भरल्याविषयी वडिलांना फोन करून कळविले. तेच नेकीसोबत शेवटचे बोलणे ठरले. त्यानंतर २९ रोजी सकाळी वडिलांनी मुलाला फोन करून नाश्ता करून घेण्याचे सांगितले व काही वेळातच हा अपघात झाल्याचे सांगताना विनायक बेलसरे यांना अश्रू आवरता आले नाहीत.

## पाचोऱ्यात उष्माघाताचा पहिला बळी ; भाजी विक्रेत्या तरुणाचा दुर्दैवी मृत्यू



पाचोरा : शहरातील जवाहर हौसिंग सोसायटीमधील आनंद नथ्थू भोई (वय ३४) या तरुणाचा उष्माघातामुळे मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना २९ रोजी सकाळी ११ वाजेपूर्वी घडली. शहरात यंदा उन्हाळ्यातील उष्माघाताचा हा पहिला बळी ठरला आहे. आनंद नथ्थू भोई हे दररोज छत्रपती शिवाजी महाराज चौकात सकाळी भाजी विक्री करून आपल्या परिवाराचा उदरनिर्वाह करत होते. नेहमीप्रमाणे आजही ते आपल्या दुकानावर भाजी विक्रीसाठी आले होते. मात्र, सकाळी १० वाजेनंतर अचानक त्यांना चक्कर आली अन् ते दुकानावर असतानाच कोसळले. ही बाब परिसरातील दुकानदारांच्या लक्षात येताच त्यांनी तातडीने धाव घेत आनंद भोई यांना उपचारासाठी ग्रामीण रुग्णालयात दाखल केले. मात्र, वैद्यकीय अधिकाऱ्यांनी तपासणीनंतर त्यांना मृत घोषित केले. अचानक झालेल्या या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त होत असून कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. वाढत्या तापमानामुळे नागरिकांनी काळजी घेण्याचे आवाहन यानिमित्त करण्यात येत आहे. या प्रकरणी पाचोरा पोलिस ठाण्यात अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे.

## जळके येथील तरुणाची गळफास घेऊन आत्महत्या

हॅलो जनता प्रतिनिधी | जळगाव

**जळगाव : जळके येथील एका १६ वर्षीय तरुणाने आपल्या राहत्या घरात गळफास घेऊन जीवनयात्रा संपवल्याची धक्कादायक घटना मंगळवारी उघडकीस आली. याप्रकरणी एमआयडीसी पोलीस ठाण्यात अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे. कल्पेश समाधान पाटील (वय १६, रा. जळके विटनेर) असे आत्महत्या केलेल्या तरुणाचे नाव आहे. मंगळवारी कल्पेश याने स्वतःच्या राहत्या घरी अज्ञात कारणावरून गळफास घेतला. हा प्रकार लक्षात आल्यानंतर त्याचे काका संदीप काशिनाथ पाटील यांनी त्याला तातडीने उपचारासाठी जळगाव येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयात हलवले. मात्र, रुग्णालयातील वैद्यकीय अधिकारी डॉ. इरफान फारूख यांनी कल्पेशची तपासणी करून त्याला मृत घोषित केले. रुग्णालयाच्या माहितीवरून एमआयडीसी पोलीस ठाण्यात अकस्मात मृत्यू ची नोंद करण्यात आली आहे.**

## दहिवद येथील बेपत्ता शिक्षकाचा विहिरीत आढळला मृतदेह



अमळनेर : तालुक्यातील दहिवद येथील शिक्षक गेल्या ३ दिवसापासून बेपत्ता होते. त्यांचा मृतदेह गावातीलच विहिरीत आढळल्याची घटना २९ रोजी सकाळी उघडकीस आल्याने संपूर्ण पंचक्रोशीत हळहळ व्यक्त होत आहे. मयत अविनाश रमेश पाटील (वय ४०) हे व्यवसायाने शिक्षक होते. त्यांचा मृतदेह संशयास्पद परिस्थितीत सापडल्यामुळे ग्रामस्थांमध्ये भीती निर्माण झाली आहे. दरम्यान अविनाश पाटील हे काही दिवसांपूर्वी घरातून बाहेर पडले. मात्र, त्यानंतर ते घरी परतलेच नाहीत. त्यांच्या कुटुंबीयांसह ग्रामस्थांनी त्यांचा शोध सुरू केला होता. अखेर तिसऱ्या दिवशी गावातील काहि नागरिकांना एका विहिरीत मृतदेह आढळला. त्यांनी ही माहिती तत्काळ इतर ग्रामस्थांना दिली. त्यानंतर ग्रामस्थांनी एकत्रितपणे प्रयत्न करून मृतदेह विहिरीतून बाहेर काढला. दरम्यान, घटनेची माहिती मिळताच अमळनेर पोलीस ठाण्याचे अधिकारी तातडीने घटनास्थळी दाखल झाले. ही विहिर दुर्गम ठिकाणी असल्यामुळे आणि परिस्थिती गंभीर असल्याने जागेवरच मरणोत्तर पंचनामा करण्यात आला. प्राथमिक तपासात मृत्यूचे नेमके कारण समजू शकले नाही. शवविच्छेदन अहवालानंतरच त्यांच्या मृत्यूबाब कारण स्पष्ट होईल, असे पोलिसांनी सांगितले. या प्रकरणी अमळनेर पोलीस ठाण्यात अकस्मात मृत्यूच नोंद करण्यात आली आहे. तपास अमळनेर पोलीस करत आहेत अविनाश पाटील हे माजी जि.प सदस्या मीनाबाई रमेश पाटील व रमेश काशीनाथ पाटील यांचे चिरंजीव होते.

## वाळूची अवैध वाहतूक करणाऱ्या दोन डंपरवर कारवाई


जळगाव : वाळूची अवैध वाहतूक करणाऱ्या दोन वाहनांवर तालुका पोलिसांनी कारवाई करीत सहा ब्रास वाळूसह १५ लाख रुपये किमतीचे दोन वाहने जप्त केली. ही कारवाई दि. २५ एप्रिल रोजी गाढोदा, किनोद दरम्यान करण्यात आली. या प्रकरणी तालुका पोलिस ठाण्यात दोन जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. जळगाव तालुका पोलिसांना गाढोदा ते किनोद रस्त्यावर १२ हजार रुपये किमतीची ४ ब्रास वाळू वाहतूक करताना एक डंपर आढळले. त्यावरील चालक फैजलखान असलमखान पठाण (वय २५, रा. पिंप्राळा) याच्याकडे वाळू वाहतुकीचा परवाना नव्हता. पथकाने ही वाळू व वाहन जप्त केले. दुसऱ्या कारवाईत किनोद ते गाढोदा दरम्यान २ ब्रास वाळूची वाहतूक करणारे डंपर पथकाने पकडले. त्यावरील चालक निखिल गजानन पाटील (रा. साकेगाव, ता. भुसावळ) याच्याकडेही वाळू वाहतुकीचा परवाना नव्हता. पथकाने ६ हजार रुपये किमतीच्या वाळूसह सात लाख रुपये किमतीचे डंपर जप्त केले. या प्रकरणी पोकॉ प्रवीण कोळी यांनी तालुका पोलिस ठाण्यात फिर्याद दिली. त्यावरून फैजलखान पठाण व निखील पाटील या दोघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास दिनेश चव्हाण करीत आहेत.

## शिष्यवृत्तीच्या परीक्षेला अडीच हजार विद्यार्थ्यांची 'दांडी'

**व्याकरण, बौध्दीकशास्त्राने फोडला घाम**

**प्राथमिक शिष्यवृत्ती परिक्षा इयत्ता-४ थी व उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षा इयत्ता ७वी परीक्षा दोन सत्रात घेण्यात आली. यावेळी दोन्ही सत्रे मिळून व्याकरण, सामाजिकशास्त्र, गणित, बौध्दीक विज्ञानाच्या प्रश्नांनी विद्यार्थ्यांना चांगलाच घाम फोडला.**

**जळगाव : महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेच्या वतीने प्राथमिक शिष्यवृत्ती परिक्षा इयत्ता ४ थी व उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षा इयत्ता ७ वी परीक्षा दि. २६ एप्रिल रोजी घेण्यात आली. जिल्ह्यात चौथीसाठी १२९ परीक्षा केंद्रे तर सातवीसाठी ८६ परीक्षा केंद्रांची व्यवस्था करण्यात आली होती. या परिक्षेला तब्बल अडीच हजार विद्यार्थी गैरहजर राहिले. चौथीतील २१ हजार ४२० तर सातवीचे १३७२६ विद्यार्थी परीक्षेला बसले होते. यात चौथीतील पहिला पेपरला १९९०१ विद्यार्थी उपस्थित होते तर १५१९ विद्यार्थी गैरहजर होते. तर दुसऱ्या पेपरला १९९९१ विद्यार्थी उपस्थीत होते. उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती परिक्षेत १३७२६ विद्यार्थी परीक्षेला बसले होते. पहिल्या पेपरला १२७६२ विद्यार्थी उपस्थित होते. तर ९६४ परीक्षार्थी गैरहजर होते. दुसऱ्या पेपरला १२७४४ विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली तर ९८२ परीक्षार्थी अनुपस्थित होते. जि.प.चे प्राथमिक शिक्षणाधिकारी निलेश पाटील यांनी तालुक्यातील ममुराबाद येथील परीक्षा केंद्रात भेट दिली. त्यासह शहरातील अनेक परीक्षा केंद्रामध्ये विद्यार्थ्यांची तपासणी केली. शिष्यवृत्ती परीक्षा शांततेत पार पडली.**



हॅलो जनता विशेष | **दिवसाढवळ्या वाळू माफियांचा धुमाकूळ; पोलिस व महसूल प्रशासन गप्प का?**

# गिरणा लुटली जातेय ! अवैध वाळूउपशावर प्रशासनाचे मौन

**भडगांव** | तालुक्यातील गिरणा नदी पात्रातून दिवसाढवळ्या सुरू असलेल्या अवैध वाळू उपशामुळे संपूर्ण परिसरात संतापाची लाट उसळली आहे. जेसीबीच्या साहाय्याने मोठ्या प्रमाणात वाळू उपसा करून डंपरद्वारे सर्रास वाहतूक केली जात असल्याचे धक्कादायक वास्तव समोर आले आहे. विशेष म्हणजे ही वाहतूक भडगाव शहरातील प्रमुख मार्गावरून शिवाजी महाराज चौक, कजगाव पोलीस मदत केंद्र तसेच मंडळ अधिकारी व ग्राम महसूल अधिकाऱ्यांच्या कार्यालयांसमोरूनच उघडपणे सुरू असल्याची माहिती स्थानिकांकडून मिळत आहे. या प्रकारामुळे पोलिस व महसूल प्रशासनाच्या कार्यक्षमतेवर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. इतक्या उघडपणे सुरू असलेल्या अवैध धंद्याकडे संबंधित यंत्रणा दुर्लक्ष का करत आहे, असा संतप्त सवाल नागरिक उपस्थित करत आहेत. गिरणा नदीपात्रात दिवसाढवळ्या जेसीबीद्वारे वाळू उपसा केला जातो आणि काही मिनिटांतच डंपर भरून शहरातून बाहेर पाठवले जातात. ही संपूर्ण प्रक्रिया इतक्या बिनधास्तपणे सुरू आहे की, प्रशासनाचा धाक उरला आहे का, असा प्रश्न निर्माण झाला आहे.



## मोठ्यांवर कारवाई कधी ? आंदोलनाची तयारी

स्थानिक नागरिकांचा आरोप आहे की, किरकोळ प्रकरणांवर कारवाई दाखवून मोठ्या प्रमाणावर अवैध धंदे करणाऱ्यांना मोकळे रान दिले जात आहे. मोठे मासे कधी जाळ्यात अडकणार? असा सवाल वारंवार उपस्थित केला जात आहे. गिरणा नदी परिसरातील शेतकरी व नागरिक लवकरच जिल्हाधिकारी व पोलीस प्रशासनाला निवेदन देऊन या प्रकाराला आळा घालण्याची मागणी करणार असल्याची माहिती समोर आली आहे. आवश्यक असल्यास आंदोलनाचा इशाराही देण्यात आला आहे. तात्काळ कारवाईची मागणी भडगाव तालुक्यातील अवैध वाळू उपसा हा केवळ पर्यावरणाचा प्रश्न नसून कायदा व सुव्यवस्थेचाही गंभीर मुद्दा बनला आहे. त्यामुळे जिल्हा प्रशासन व पोलीस विभागाने तात्काळ लक्ष घालून दोषींवर कठोर कारवाई करावी, अशी जोरदार मागणी नागरिकांकडून होत आहे

### वसुलीमुळे 'नो' कारवाई

अवैध वाळू वाहतूक थांबवण्यासाठी ठोस कारवाई का होत नाही? पोलीस व महसूल विभाग याबाबत निष्क्रय का आहेत? मोठ्या प्रमाणात होत असलेल्या वसुलीमुळेच कारवाईकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले जात आहे का? मोठे वाहनधारक व अवैध धंदे करणारे अजूनही कायद्याच्या कक्षेबाहेर का आहेत? अशा अनेक गंभीर प्रश्नांनी नागरिकांमध्ये असंतोष वाढला आहे. पर्यावरणावर घातक परिणाम अनियंत्रित वाळू उपशामुळे नदीपात्राची नैसर्गिक रचना बिघडत असून भूजल पातळी घटण्याचा धोका वाढला आहे. याचा थेट परिणाम परिसरातील शेती व पाण्याच्या उपलब्धतेवर होत असल्याची भीती शेतकरी व्यक्त करत आहेत. भविष्यात पूरस्थिती अधिक गंभीर होण्याची शक्यता देखील तज्ज्ञांकडून व्यक्त केली जात आहे.

आध्यात्मिक | *अधिक मासानिमित्त श्री संत सखाराम महाराज यांच्या प्रेरणेने आयोजन*

## चाळीसगावात ९ कुंडी श्रीराम याग हवन, प्रवचनासह कीर्तन सोहळ्याचे आयोजन



**श्री संत सखाराम महाराज अमळनेर सेवा संघ चाळीसगाव यांच्या वतीने चाळीसगाव नगरीमध्ये नऊ कुंडी श्रीराम याग प्रवचन व किर्तन सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. यापूर्वी देखील १९ ते २३ जानेवारी २०१४ मध्ये श्री महा विष्णू यागाचे भव्य दिव्य आयोजन करण्यात आलेले होते. श्री विष्णू यागाच्या यशस्वी आयोजना नंतर आता पुरुषोत्तम मास म्हणजेच अधिक मासानिमित्त श्री संत सखाराम महाराज यांच्या प्रेरणेने आयोजन करण्यात आले आहे. कुटिया व हवन कुंड साकारण्यासाठी राजस्थान येथील कारागीर येणार आहेत. यासाठी बेलदारवाडी येथील गोशाळेतून गायीचे शेण आणले जाईल. तसेच वड, पिंपळ, औदूंबर, बेल, तुळस, रुई, आंबा या झाडांची लाकडे हवनाकुंडात वापरण्यात येतील. तसेच ३ दिवसांत १०८ जोडपे हवन करतील. अर्चन विधीत कुंकू अर्चना, तुलसी अर्चना, फळ अर्चना करुन महिला भगिनी श्रीरामांच्या प्रतिमेस कुंकू अर्चन करतील. यज्ञ लोकसहभागातून होत असून सरासरी २० हजार लोकांना अन्नदान केले जाईल. इतर सर्व प्रकारची मदत आमदार मंगेश चव्हाण यांच्यातर्फे करण्यात येणार आहे.**

### नामांकित कीर्तनकारांची उपस्थिती

या सोहळ्यामध्ये २५ रोजी सकाळी ८ ते दुपारी १ वाजेपर्यंत देवता स्थापना मंडप प्रवेश मंडप पूजन अग्नी स्थापना व नऊ कुंडांमध्ये हवन. दुपारी ४ वाजता हभप समिहान चंद्रशेखर महाराज आठवले, पंढरपूर यांचे रामायणावर आधारित प्रवचन. सायंकाळी ६ वाजता परमपूज्य श्री प्रसाद महाराज यांचा हरिपाठ आणि रात्री ८ वाजता हभप वेदभूषण श्री उद्धोध म पैठणकर, श्री क्षेत्र देऊळगाव राजा यांचे कीर्तन आयोजित केले आहे. २६ रोजी सकाळी ८ वाजेपासून स्थापित देवता पूजन, प्रधान देवता हवन, श्रीराम रक्षा हवन होईल. दुपारी ४ वाजता हभप समीहन चंद्रशेखर महाराज आठवले पंढरपूर यांचे प्रवचन आयोजित केले आहे,

### २७ रोजी काल्याचे कीर्तन, महाप्रसादाचे आयोजन

२६ रोजी सायंकाळी ६ वाजता परमपूज्य श्री प्रसाद महाराज यांचा हरिपाठ होईल व रात्री ८ वाजता हभप श्री पराग महाराज चातुर्मास्ये, अनवा-पंढरपूर यांचे किर्तन होईल. २७ रोजी सकाळी ८ ते१ दरम्यान नऊ कुंडांमध्ये हवन व पूर्णाहुती होईल, याचबरोबर सकाळी १० वाजता हभप श्री गुरुराज महाराज देगलूरकर, देगलूर-पंढरपूर यांचे काल्याचे किर्तन होईल.

## संत सखाराम महाराज यात्रोत्सवात १८६० महिलांची भरली ओटी

पालखी मिरवणुकीत पथकांचा सहभाग मिरवणुकीत घोडेस्वार, भालदार-चोपदार, लेझीम पथके, ढोल पथके व भुसावळ रेल्वे बँड सहभागी होणार आहेत. सराफ बाजार, फरशी पूल, पैलाडमार्गे सायंकाळी पालखी पुन्हा वाडी संस्थानात दाखल होईल.




**अमळनेर संत सखाराम महाराज यात्रोत्सवानिमित्त शहरातील संत सखाराम महाराज वाडी येथे महिलांच्या ओटी भरण्याचा पारंपरिक धार्मिक कार्यक्रम मोठ्या उत्साहात पार पडला. ११ वे गादी पुरुषप्रसाद महाराज यांच्या हस्ते झालेल्या या सोहळ्यात तब्बल १८६० महिलांची ओटी भरली गेली. भजन, कीर्तन आणि जयघोषाने परिसर भक्तिमय झाला होता. सकाळी ११ वाजेपासूनच ओटी भरण्यासाठी महिलांच्या लांबच लांब रांगा लागल्या होत्या. महिलांसोबत पुरुष भक्तांचाही सहभाग लक्षणीय दिसून आला. दरवर्षीप्रमाणे यंदाही पारंपरिक पद्धतीने महिलांना ब्लाऊज पीस व तांदूळ देऊन ओटी भरण्यात आली. पुरुष भक्तांना तांदूळ वाटप केले. प. पू. प्रसाद महाराज यांच्या हस्ते ओटी भरून घेण्यासाठी महिलांमध्ये उत्सुकता होती.**

### यात्रोत्सवात भक्तिमय वातावरणाची अनुभूती

अमळनेर शहरासह तालुक्यातील विविध भागांतून महिला भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित राहिल्या होत्या. भजन, कीर्तन आणि जयघोषामुळे संपूर्ण परिसर आध्यात्मिक वातावरणाने भारावून गेला होता. संत सखाराम महाराजांच्या पवित्र स्थळी गादी पुरुषांच्या हस्ते ओटी भरून घेण्याचा योग लाभल्याने महिलांनी समाधान व्यक्त केले.

### संत सखाराम महाराजांचा आज पालखी सोहळा

वैशाख पौर्णिमेनिमित्त संत सखाराम महाराज विठ्ठल-रुक्मिणी संस्थानाचा भव्य पालखी उत्सव १ मे रोजी उत्साहात पार पडणार आहे. सकाळी ६ वाजता वाडी संस्थानातून पालखी मिरवणुकीस प्रारंभ होईल. आकर्षक सजावटीतील लालजीची मूर्ती पालखीत विराजमान असेल. प.पू. प्रसाद महाराज अनवाणी पायी चालत भाविकांना दर्शन देतील.




**जन आवाज**

**गो सन्मान आव्हान अभियानाला मिळाला उत्स्फूर्त असा प्रतिसाद.**

# भडगावात 'गोमाता सन्मान' शोभायात्रा !

**भडगाव : देशभर सुरू असलेल्या 'गो सन्मान आव्हान अभियान'ला प्रतिसाद देत भडगाव शहरात सोमवारी 'गोमाता सन्मान शोभायात्रा' मोठ्या उत्साहात आणि शिस्तबद्ध पद्धतीने काढण्यात आली. गोमातेला 'राष्ट्रमाता'चा दर्जा मिळावा, तसेच तिचे संरक्षण, संवर्धन आणि सन्मान सुनिश्चित व्हावा, या प्रमुख मागण्यांसाठी विविध हिंदू संघटनांनी एकत्र येत जनजागृतीचा संदेश दिला. या शोभायात्रेचे आयोजन सकल हिंदू समाजाच्या पुढाकारातून करण्यात आले होते. यात विश्व हिंदू परिषद, राष्ट्रीय स्वयंसेवक संघ (आर.एस.एस.), बजरंग दल आणि शिवप्रतिष्ठान हिंदुस्तान या संघटनांचा सक्रिय सहभाग होता. शहरातील बाजार चौकातून सुरू झालेली ही शोभायात्रा शिवाजी महाराज चौक मार्गे भडगाव तहसील कार्यालयापर्यंत शांततेत पोहोचली. यावेळी विविध घोषणांनी परिसर दुमदुमला होता. गोहत्या बंदीची कडक अमलबजावणी करावी सहभागी कार्यकर्त्यांनी गोसंवर्धन, गोहत्या बंदीची कडक अंमलबजावणी, तसेच गोशाळांना शासकीय मदत वाढविण्याच्या मागण्या मांडल्या. समाजातील सर्व घटकांनी एकत्र येत गोमातेच्या संरक्षणासाठी पुढाकार घ्यावा, असे आवाहनही करण्यात आले. शोभायात्रेच्या शेवटी भडगावचे नायब तहसीलदार अनिल भामरे यांना निवेदन देण्यात आले. या निवेदनात गोमातेला सन्मानाचे स्थान मिळावे, तिच्या संरक्षणासाठी कठोर कायदे व प्रभावी अंमलबजावणी व्हावी, तसेच जनजागृती मोहिमा राबविण्याची मागणी करण्यात आली. विविध संघटनांचा होता रॅलीत सहभाग या कार्यक्रमाला भद्रा माळी, नाना हडपे, साजन पाटील, मयूर मालपुरे, श्याम मुसंडे, रवींद्र पाटील, रोहित भाई, चेतन पाटील यांच्यासह भडगाव शहर व तालुक्यातील विविध संघटनांचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. शांततेच्या मार्गाने आणि शिस्तीचे उत्तम उदाहरण ठेवत पार पडलेल्या या शोभायात्रेमुळे शहरात सामाजिक एकात्मतेचा संदेशही दिला गेला. आयोजकांनी पुढील काळातही अशा जनजागृती मोहिमा अधिक व्यापक स्वरूपात राबविण्याचा निर्धार व्यक्त केला.**

साप्ताहिक "हॅलो जनता" हे वृत्तपत्र मालक, प्रकाशक, मुद्रांक, संपादक श्री. प्रमोद रूले यांनी 'दर्शन ॲडव्हटाईजमेंट' यांच्या संयुक्त विद्यमाने जळगांव येथे मुद्रीत करून जळगांव येथून ऑनलाइन प्रकाशित केले.
(वृत्तपत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकूराशी मालक, प्रकाशक, मुद्रांक, संपादक व सहसंपादक मंडळ सहमत असतीलच असे नाही.) जळगांव न्यायालयीन कक्षांतर्गत.
The weekly "Hello Janata" was printed by the newspaper owner, publisher, stamp, editor Mr. Pramod Rule in Jalgaon in association with 'Darshan Advertisement' and published online from Jalgaon. (The owner, publisher, stamp, editor and co-editors do not necessarily agree with the content published in the newspaper.) Under the Jalgaon Judicial Cell.